CNR No. MHRG040011032024

## भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ३१/२०२४ मधील निशाणी क्र. २५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने रेफरन्स अर्जात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सामनेवाले यांनी निशाणी क्र.२७ अन्वये अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. अर्जदारांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, रेफरन्स दाखल करतेवेळी अर्जदारांची आर्थिक ऐपत नसल्याने त्यांनी प्रति चौ.मी. ला १,०००/- रूपयांची मागणी केली असुन संपादित क्षेत्राला प्रति चौ.मी. ५,०००/- प्रमाणे बाजारभाव मिळणे आवश्यक असुन आर्थिक परिस्थिती अर्जदारांची आज ही हलाखीची असल्याने ते संपादित जमिनीस १,५००/- प्रति चौ.मी. ने मागणी करीत असुन परिच्छेद क्र.८ व ९ मध्ये त्या अनुषंगाने रकमेबाबत दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी.

३. सामनेवाला यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, अर्ज मुदतबाहय असुन अर्जास एस्टॉपल व ॲक्वीझन्स या न्यायतत्वांची बाधा असुन अर्जात दुरूस्तीचे सबळ कारण दिलेले नसुन अर्ज तांत्रीकदृष्टया दोषपुर्ण आहे. यापुढे त्यांनी प्रतिपादन केले की, अर्ज मंजूर केल्यास मुळ अर्जाचे स्वरूप बदलणार असुन मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या खंडपीठाने अलिकडे दिलेल्या निर्णयानुसार भुसंपादन कायदा, कलम ९ (३)(४) नुसार प्राप्त नोटीसच्या वेळी ज्या दराची मागणी केली असेल त्यापेक्षा वाढीव नुकसानभरपाई अर्जदारांना मागता येणार नाही व सदर अर्ज खर्च लावुन फेटाळण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन करता व अर्जदार व सामनेवाले यांचे वि. अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसून येते की, प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरूस्ती केल्यास मुळ अर्जाच्या स्वरूपात कुठलाही बदल होत नाही. न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सदरहू अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदारांना मुळ अर्जात प्रार्थित दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2025.12.05 17:55:27 +0530

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल

पनवेल
दिनांक ०५/१२/२०२५.